26

# १८. भारतातील स्त्री उद्योजकता : संधी आणि आव्हाने

डॉ. ई. जे. जगताप
कु. वैशाली जाधव
संशोधक विद्यार्थी, अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर, पुणे.


## गोषवारा

आज 2020 शतकामध्ये आपण स्त्री-पुरूषांच्या समानतेविषयी आपली मतं मांडत आहोत. मात्र काही अपवाद वगळता आजच्या परिस्थितीत बदल झालेला दिसून येत नाही. आज विविध क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. नवनवीन क्षेत्रांमध्ये महिलांच्या टक्का वाढतोय ही नक्कीच सुखावह गोष्ट आहे. आपल्या देशात मोठया प्रमाणात मनुष्यबळ असून त्यातही महिलांचा टक्का मोठया प्रमाणात आहे. आजच्या काळातील स्त्री ही शिक्षणाने सक्षम झाली असून आर्थिकदृष्टया स्वत:च्या पायावर उभी आहे. जागतिक पातळीवर विचार करता 126 मिलियनहून अधिक महिलानी उदयोग सुरू केलेत आणि करत आहेत. यात भारताचा विचार जर केला तर 8 मिलीयनहून आधिक महीला अनेक उदयोगात सक्रिय आहेत. आपल्याकडं काही वर्षांपूर्वी महिला उदयोग म्हणजे स्वयंरोजगार किंवा गृहोदयोग अशी परिस्थिती होती. आपला घरसंसार सांभाळून जमेल ते करणे, परंतु आता हे चित्र हळूहळू बदलते आहे. उदयोजकतेकडे बघण्याचा महिलांचा दृष्टीकोन आज बदलत आहे. महिलांच्या उदयोगांना समाजाकडूनही स्वीकार्हता मिळत आहे. त्याचबरोबर त्यांना मिळणारी वित्तीय मदत आणि उदयोग विश्वातील आदर्श याही आज जमेच्या बाजू आहेत. महिलांकडे उपजतच उत्तम व्यवस्थापन,संगठण कौशल्य, चोख व्यवहार इत्यादी उपजत गुणांमुळे तिला तिच्या उदयोगाच्या वाढीसाठी निश्चितच फायदा होतो. प्रस्तुत शोधनिबंधा मध्ये भारतातील महिला उदयोजकांची स्थिती, महिलांउदयोजकांसाठी सरकारने आखलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला आहे.


**मुख्य शब्दः-** महिला उदयोजकता, व्यवस्थापकीय कौशल्य, निर्णयक्षमता

## प्रस्तावना

जसजसा काळ बदलतगेला तसतसा स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलत गेला. स्त्रीची प्रतिमा झपाटयाने बदलली असून विविध क्षेत्रांत स्त्री ही पुरूषांच्या बरोबरीने अनेक प्रकारच्या जबाबदा-या सक्षमपणे पेलत आहे.जगभर महिलांना विविध हक्क आणि अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी अगदी 20 व्या शातकाच्या मध्यापर्यंत झगडावे लागले. पण राजकारण,वृत्तपत्रे, समाजकार्य, शिक्षण आणि अन्य क्षेत्रांत आतापर्यंत हेघडत होते. अस असंल तरी गेल्या काही दशकांत अनेक स्त्रियांनी सर्व क्षेत्रांत प्रचंड भरारी घेतली असून काही आपल्या देशाच्या सर्वोच्चस्थानी आरूढ देखील झाल्या आहेत. आजही यांत्रिकी,वैदयक,व्यापार,उदयोग आणि अन्य क्षेत्रांत त्यांनी उच्चस्थाने भूषविली आहेत. विशेषत: यांत्रिकी,व्यवस्थापकीय, वाणिज्य आणि माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात हे घडत आहे. बाहेरची जबाबदारी सांभाळतांना त्यांनी आपले संसारही सांभाळले आहेत. एकीकडे अत्युच्च कारकीर्द तर दुसरीकडे समाधानी कौटुंबिक जीवन, एक प्रकारे अशी तारेवरची कसरत त्यांनी यशस्वीरित्या केली आहे..

## संशोधनाची उदिष्टे

1. स्त्री उदयोजकतेचा अर्थ समजावून घेणे
2. भारतातील स्त्री उदयोजकांपुढील समस्या जाणून घेणे.

| 4 | दिपाली गोएंका | मुख्य कार्यकारी संचालक | वेलस्पन इंडियासाठी |
|---|---|---|---|
| 5 | स्वाती पिरामल | कार्यकारी संचालक | निकोलस पिरामल कुंपनी |
| 6 | सुलज्जा फिरोदिया मोटवाणी | सहव्यवस्थापक संचालक | कायनेटिक इंजिनिअरिंग |
| 7 | ललिता गुप्ते | सहव्यवस्थापक संचालक | कायनेटिक इंजिनिअरिंग |
| 8 | रेणु फर्नाडि | कार्यकारी संचालक | हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन |
| 9 | अमृता पटेल | अध्यक्षा | राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ |
| 10 | हेमा रविचंदर | वरिष्ठ उपाध्यक्ष | इन्फोसिस |
| 11 | मल्लिका श्रीनिवासन | संचालक | ट्रॅक्टर आणि फार्म इक्विपमेंट |
| 12 | प्रिया पॉल | अध्यक्षा | अपेजॉय सुरेंद्र पार्क हॉटेल्स |
| 13 | संगीता नलवाड | कार्यकारी संचालक | टाटा.टी. |
| 14 | संगीता सिंग | उपाध्यक्ष | विप्रो |
| 15 | तान्या दुभास | विपननसंचालक | गोदरेज कन्झुमर प्रॉडक्ट लि. |
| 16 | एकता कपूर | निर्मिती संचालक | बालाजी टेलिफिल्मस् |
| 17 | शेहनाज हुसेन | निर्मिती संचालक | नॅचरल ब्युटी कॉस्मेटिक्स[प्रॉडक्ट] |

संदर्भः-संकेतस्थळ- भारतातील यशस्वी उदयोजक

तक्ता क्र.1.2 मध्ये भारतातील राज्यानुसार महिला उदयोजकांची संख्या दर्शवली आहे

### राज्यानुसार महिला उदयोजकांची संख्या

| अ.क्र | राज्याचे नाव | महिलांनी व्यवस्थापीत केलेल्या उपक्रमांची संख्या | महिला उपक्रमांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | जम्मू आणि काश्मीर | 5640 | 5742 |
| 2 | हिमाचल प्रदेश | 3515 | 3722 |
| 3 | पंजाब | 30190 | 29068 |
| 4 | चंदीगड | 2059 | 2243 |
| 5 | उत्तरांचल | 8706 | 8804 |
| 6 | हरियाणा | 10087 | 9620 |
| 7 | दिल्ली | 13368 | 14383 |
| 8 | राजस्थान | 29785 | 36371 |
| 9 | उत्तर प्रदेश | 54491 | 72667 |
| 10 | बिहार | 38170 | 49443 |
| 11 | सिक्किम | 30 | 98 |
| 12 | अरूणाचल प्रदेश | 131 | 150 |
| 13 | नागालँड | 207 | 179 |

**3.उदयोगातील आदर्शाची कमतरता:-**प्रत्येकाच्या आयुष्याचा एखादा आदर्श असतो. मला अमूक व्यक्ती सारखं व्हायचं, त्यासारखं यश मिळवायचं अशी प्रत्येकजण स्वत:शी खूणगाठ बांधत असतो. म्हणजे तो आपला आदर्श असतो. महिला उदयोगविश्वात अशा प्रकारचे आदर्श व्यक्ती म्हणजे [Role Model] फार कमी आहेत. त्याचाही परीणाम महिला उदयोजकता विकासावर होतो.

**4.शासकीय धोरण:-** कोणत्याही उदयोगात उदयोजकीय सरकारी धोरणांची खूप मोठी भूमिका असते, सरकारी विविध धोरणं आणि त्यांची अंमलबजावणी,महिला उदयोजकांचा विचार करून त्यानुसार त्यांना दिल्या जाणा-या सोयीसुविधा या तुलनात्मक रित्या कमी आहेत किंवा आहे त्या सोयीसुविधांविषयी महिलांना फार कमी माहिती असते.

**5.भांडवलीची कमतरता:-** भांडवलाच्या टंचाईमुळे स्त्री उदयोजकांच्या आर्थिक व्हवहारांमध्ये सुरळितपणा राहत नाही. त्यांना देणी फेडता येत नाही आणि भांडवलाअभावी आधुनिक यंत्राचा वापर देखील करता येत नाही.

**6.उपयुक्त माहितीचा अभाव:-** उदयोग स्थापना,यंत्र खरेदी,कच्चा माल,उत्पादित मालाची विक्रिव उत्पादनाची प्रक्रिया इत्यादी विषयी उपयुक्त माहिती स्त्री उदयोजकांना मिळत नसल्यामुळे उत्पादनाची प्रक्रिया खंडित होऊन त्याचा उत्पादनावर परिणाम होतो.

**महिला नवउद्योजकांसाठी भारत सरकारच्या खास योजना**

अलीकडच्या काळात महिला सक्षमीकरणाचे वारे वेगाने वाहत असुन स्त्रिया देखील चाकोरी बाहेर पडुन स्वत:ला सिध्द करुन यशाचे एकेक शिखर गाठत आहेत. आव्हानांनवर मात करण्यासाठी स्वत:ला सक्षम बनवण्याकडे त्यांचा जास्त कल दिसुन येतो आहे त्यातल्या त्यात महत्वाचे म्हणजे तिला घरुन याकरीता पाठींबा मिळतो आहे हे चित्र फार आश्वासक आहे. शिवाय आणखी एक कौतुकास्पद गोष्ट म्हणजे महिलांच्या ह्या प्रगतीच्या वाटचालीत महिलांना आणखी सशक्त बनवण्यासाठी भारत सरकारने अनेक पाऊले उचलली आहेत. त्यातलेच एक महत्वाचे पाऊल म्हणजे खास महिलांना डोळ्या समोर ठेवुन विविध योजना आखल्या आहेत आणि एवढ्यावरच न थांबता, त्या योजना व्यवस्थित राबविल्याही जात आहेत.

भारतात बेटी बचाओ, बेटी पढाओ, स्टँड अप इंडिया, मिशन इंद्रधनुष्य आणि इतर अनेक जणांनी पुढाकार घेतला आहे आणि येणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक ह्यात अधिक अधिक महिला उद्योजकांचा समावेश होतो आहे. हे फक्त शहरांपुरतेच मर्यादित नसुन याचा प्रसार लहान मोठ्या गावांतुन देखील झालेला दिसतो आहे.

**1) मुद्रा योजना :-** ब्युटी पार्लर, ट्युशन सेंटर, टेलरींग युनिट इत्यादी सारख्या लहान उद्योगाची सुरूवात करणाऱ्या महिलांसाठी ही सामान्य सरकारी योजना असुन ज्या महिला एकत्रितपणे प्रारंभ करुन इच्छितात त्यांच्यासाठी देखील ही योजना उपयुक्त आहे. या योजनेअंतर्गत रू. 50 हजारांपासुन ते रू. 50 लाखापर्यंत कर्ज मंजुर केले जावू शकते.यात कर्जाची रक्कम 10 लाखापेक्षा जास्त असेल तरच तारण आणि गॅरंटरची आवश्यकता असते.

**2) ट्रेंड (व्यापार संबंधित उद्योजकता सहाय्य आणि विकास) योजना**

ह्या योजनेचा उेश स्त्रियांनी चालवलेल्या प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, विशिष्ट प्रशिक्षण व सल्ला देणे आणि त्या संबंधित गरजा पुर्ण करणे असा असुन त्यासाठी महिलांना योग्य ती माहिती पुरविली जाते.

**3) महिला उद्योग निधी योजना**

स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया ( एसआयडीबीआय) द्वारा देऊ केली गेलेली ही योजना नवीन लघुउद्योग स्थापित करण्यासाठी 10 लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य प्रदान करते. विद्यमान प्रकल्पांचे उन्नतीकरण आणि आधुनिकीकरण करण्यासाठी देखील मदत केली जाते.

अनेक स्त्रीया घट्ट पाय रोवुन उभ्या असुन अनेक प्रकारचे आव्हाने, संघर्ष, अपयशाला मागे टाकत यश मिळवत आहेत. डर के आगे जीत है हे सिध्द करीत आहेत. वर्षानुवर्ष शासन स्त्रियांना उद्योजकासाठी प्रोत्साहन देवुन त्यांच्यासाठी अनेक योजना राबवित आहेत. अनेक प्रकारच्या सवलती व अनुदान देऊन बँका स्त्री उद्योजकांना कर्ज पुरवठा करीत आहे. बचत गट आणि आर्थिक दुर्बल घटकांना मदत करण्यासाठी सक्षम यंत्रणा कार्यरत आहे मध्यम व लघु उद्योजकांसाठी सरकारी योजना खुप आहेत. त्याचा लाभ त्यांनी घेतला पाहिजे. प्रत्येक स्त्रीला निर्णय स्वातंत्र, वैचारीक स्वातंत्र, अर्थिक स्वातंत्र असेल तरच ती स्त्री सबला होऊ शकेल. स्वयंमसिध्दा होवु शकेल. स्त्रीयांना उद्योगातील काडीमात्र कळत नाही असा समाजातील बहुसंख्य पुरूषांचा समज होता. परंतु काही महिलांनी एकत्र येऊन पापड बनविण्याचा उद्योग सुरु केला आणि हळूहळू आपल्या पापडाची लिज्जत जभगर पसरवली. लिज्जत पापडाने आपल पाव केवळ देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गाजवल आणि महिला उद्योजकांचे खरे अस्तित्व या पुरूष प्रधान समाजाला कळले. भारतात बँगलोर, दिल्ली, चेन्नई, हैद्राबाद, मुंबई अशा प्रमुख शहरांमध्ये उद्योजक महिलांचे प्रमाण वाढत आहे. ही निश्चितच सुखावह गोष्ट आहे. महिलांनी तयारी करुन उद्योगात उतरवल्यास लवकरच उद्योग विश्वात एक नवचैतन्य उसळेल आणि मोठ्या प्रमाणात उद्योजिका उदयास येतील.

### संदर्भ


1) जाधवर आणि इतर ( 2013) व्यवसायिक उद्योजकता पान नं. 4.32 ते 4.39.

2) व्यवसाय प्रशासन - डॉ. सुनील जोशी - निराली प्रकाशन, जुन 2014.

3) देशमुख प्रभाकर, उद्योजकता विकास, संकल्पना आणि व्यवहार, पिंपळपुरे प्रकाशन,नागपुर , 2013

4) लोकसत्ता वृत्तपत्र, जानेवारी 14, 2017.

5) esakal.com, जानेवरी 6 , 2020

6) लोकराज्य मार्च 2018.

7) यशस्वी उद्योजक जुलै 2019.

8) योजना सप्टेंबर 2016.

9) योजना जुन 2012.

10) विकास पीडीया.